# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८(अ)(१) अन्वये दुरुस्ती आदेश.

जा.क्र.वि-१/ सोसा./क.७८(१)/प्रशा.नि.आदेश/२०१७
उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक, तालुका नाशिक,
याचे कार्यालय, सहकार सकुंल, नॅशनल ऊर्दू हायस्कूल
जवळ, सारडा सर्कल, नाशिक.
दिनांक २९/०४/२०१७

वाचावे :- १) श्री कहाननगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.देवळाली कँप, ,ता जि नाशिक या संस्थेच्या ०१ ते ०५ संचालकांनी या कार्यालयास सादर केलेले राजीनामे.

२) या कार्यालयाकडिल कारणे दाखवा नोटीस जा.क्र.विकास-१/श्री कहाननगर हौ.सोसा./क.७८ (१)/का.दा.नोटीस/१७, दिनांक २७/०२/२०१७.

३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ (अ)(१) मधील तरतुद.

४) या कार्यालयाचा जा क्रं दिनांक २०/०३/२०१७ रोजीचा आदेश.

ज्याअर्थी, श्री कहाननगर को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.देवळाली कँप,ता जि नाशिक (ज्याचा उल्लेख यापुढे 'संस्था' असा केला आहे) ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ (ज्याचा उल्लेख यापुढे 'अधिनियम' व 'नियम' असा केला आहे) अन्वये नोंदविण्यात आलेली सहकारी संस्था आहे. सदर संस्थेचे कामकाज अधिनियम, नियम, संस्थेने स्विकारलेल्या पोटनियमातील तरतुदी तसेच शासकीय मार्गदर्शक सुचनानुसार चालविणे संस्थेच्या संचालक मंडळावर बंधनकारक आहे.

२/- ज्याअर्थी, संस्थेचे चेअरमन यांनी त्यांचे दिनांक १५/०२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये, संस्थेचे पुढीलप्रमाणे नमुद संचालक श्री अरविंद एम बोतदरा, श्रीमती शशिकला के जैन, श्रीमती मनोरमा एस जैन, श्री अनिलकुमार आर जैन , श्रीमती पारुल एच शाह यांनी त्यांचेकडील दिनाक ०२/२/२०१७ रोजीचे पत्रान्वये, त्यांनी संचालक पदाचा राजीनामा दिला असल्याचे नमुद करुन, त्यांचे राजीनामे पुढील कार्यवाहीसाठी या कार्यालयास पृष्ठांकित करुन,सदर पत्रात विविध कारणे नमुद करुन, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणेबाबत विनंती केल्यानतर या कार्यालयाने वाचावे क्रमांक ४ अन्वये या कार्यालयाने सदर संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ (अ)(१) मधील तरतुदी नुसार, प्रशासक नियुक्ती केलेली होती.

३/- ज्याअर्थी, श्री एल एम गमे, सहाय्यक सहकार अधिकारी , यांची प्रशासक म्हणुन नियुक्ती केल्यानंतर, श्री एल एम गमे, यांची माहे मे २०१७ मध्ये बदली होणार आहे असे श्री गमे यांनी या कार्यालयाचे निदर्शनास आणुन दिलेले आहे.

४/- त्याअर्थी, संस्थेचा कारभार चालविण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ (१) अन्वये या कार्यालयाचे वाचावे क्रं.४ मध्ये नमुद प्रशासक नियुक्ती आदेशात बदल करणे आवश्यक असल्याने मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ (अ)(१) मधील तरतुदी नुसार, श्री कहाननगर को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.देवळाली कँप, बेलतगव्हाणरोड,लॅमरोड,ता जि नाशिक. या संस्थेचे संचालक मंडळ निष्प्रभावीत करण्याचा आदेश देत असुन, संस्थेचा कारभार चालविण्यासाठी या कार्यालयाचे आस्थापनेवरील श्री. एल एम गमे,सहाय्यक सहकार अधिकारी, अधिन- उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक तालुका, नाशिक यांचेऐवजी श्री आर सी गजरे, सहकार अधिकारी, श्रेणी-२ यांची प्रशासक म्हणुन नेमणूक करीत आहे.

प्रशासक यांनी संस्थेच्या समितीची निवडणूक प्रक्रिया सहा महिन्याच्या आंत राबवून नवनियुक्त समितीकडे पदभार सोपविण्याची कार्यवाही करावी.

सदरचा आदेश आज दिनांक २९/०४/२०१७ रोजी माझे सही व कार्यालयिन मुद्रेसह दिला असे.

दिनाक २९/०४/२०१७
ठिकाण- नाशिक.

( डॉ.प्रिया दळणर )
उपनिबंधक
सहकारी संस्था, नाशिक तालुका, नाशिक.

Scanned by CamScanner